# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(863)

झो.पु.प्रा
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन ,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.१८६/१५४३/२०२४ दि.०१/०८/२०२४.

## अंतिम भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) जा.क्र.१८६३/२०१६ दि.२०१६/११/१८
२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र.१२६५/२०२४, दि. १०/०५/२०२४.
३) अंशतभोगवटा प्रमाणपत्र : जा.क्र. झोपुप्रा/तां-१/भोप्र/मा.क्र.१८६/२१०९/२०२३ दि.०८/११/२०२३
४) वास्तूविशारद यांनी केलेला अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा दि.२७/०६/२०२४ रोजीचे विनंती अर्ज.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे **सि.स.नं.२००, फा.प्लॉ.क्र. ५ पै, सब प्लॉ. क्र.४, मंगळवार पेठ, पुणे** येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील (पुनर्वसन घटक) इमारतीस या कार्यालयाकडून जा. क्र झोपुप्रा/तां.३/ मा.क्र.१८६/१२६५/२०२४, दि. १०/०५/२०२४ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. उपरोक्त वाचा मधील क्र. ३ अन्वये योजनेतील पुनर्वसन ४३ सदनिका व ०१ दुकानसाठी भोगवटा प्रमाणपत्र अदा करण्यात आला आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे संयुक्त इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिकासाठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे वास्तूविशारद यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे उर्वरित मुक्त विक्री घटकांना भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

**विक्री घटक:**

| अ.क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (विक्री घटक) | एकूण सदनिका |
|---|---|---|---|
| २) | पहिला | सदनिका क्र. १०१,१०२,१०३ | ३ सदनिका |

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी खालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून विषयांकीत संयुक्त इमारतीस अंतिम भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत अंतिम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र

प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंतिम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तीचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) सदर योजनेमधील बांधकामास भोगवटा प्रमाणपत्र दि. ०९/११/२०२३ रोजीच्या Final Fire NOC ला अधीन राहून देणेत येत आहे. सदर इमारतीस आग संरक्षण देणेकामी विषयांकीत Fire NOC मध्ये नमूद सर्व बाबी विकसकावर बंधनकारक राहील.

७) सदर योजनेसाठी पुरविण्यात आलेल्या विद्युत व्यवस्थेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत (MSEDCL) यांचेकडील मार्गदर्शक सुचनांचे पालन करून, त्याबाबतचा पुरवठा करणे विकसकावर बंधनकारक राहील.

८) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

९) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, अंतिम टप्प्यातील टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

{ मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे
दि.०५/०८/२०२४ रोजीचे मान्यतेने }

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

सहायक संचालक नगररचना ,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

प्रत :- १. विकसक मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि.
स. नं. ३७, प्लॉ. नं. ३९/५, मोर्य कृपा को. ऑप हौसिंग सोसायटी, प्रतिज्ञा हॉल जवळ, समर्थ रोड, हिंगणे बुद्रुक, पुणे-४११०५२.

२.वास्तुविशारद श्री राहुल माळवदकर
स.नं. ६७२/६७३ प्लॉट १०, लोकेश सोसायटी, समर्थ बिल्डिंग, बिबवेवाडी पुणे ३७.

३. तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.